दैनिक Email:-dailylokpradhan@gmail.com
लोकप्रधान
15/09/2024 : Page 03

# तेलगाव सीना जि.प.शाळेत सायबर सुरक्षेवर मार्गदर्शन

**लोकप्रधान न्युज नेटवर्क**

**नारायण घंटे,(दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी)**

उतर सोलापूर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील संगणक शास्त्र संकुल, क्वीक हिल फाउंडेशन आणि जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तेलगाव सीना येथे सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा कार्यक्रम घेण्यात आला. अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका माधुरी जाधव हे होत्या. यावेळी संगणक शास्त्र संकुलातील राहुल शिंदे व मोहिनी दुधाळ यांनी सांगितले की, फसवणूक होऊ नये म्हणून त्याबद्दल खात्री करूनच त्यावर विश्वास ठेवावा. त्यासाठी ओटीपी कोणास सांगू नये, अनोळखी नंबर वरून आलेले फोन कॉल्सची पडताळणी करावी.

व्हाट्सअप व इतर सोशल मीडियावर आलेल्या मेसेजेस व लिंकची शहानिशा करूनच पुढील प्रक्रिया करावी. पासवर्ड स्ट्रॉग वापरून स्वतःची माहिती सुरक्षित करावी. त्यासाठी मोबाईल, कॉम्प्युटर, लॅपटॉप




आदी साधनांवर अधिकृत अँटीव्हायरसचा वापर करावा. या कार्यक्रमासाठी एकूण १६० विद्यार्थी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी असलेल्या जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापिका माधुरी जाधव यांनी मार्गदर्शन केले. यावेळेस जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक प्रदीप माने प्रदीप पाटील शाम जाधव शिवाजी भोसले शिक्षिका जलराणी काडादी यांनी सहकार्य केले. शिवाजी भोसले यांनी सूत्रसंचालन केले.यांनी आभार जिल्हा परिषद शाळेच्या शिक्षिक प्रदीप माने यांनी मानले.